
**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal (Journal No. 40776)**

ISSN 2277-5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL



Volume-VII, Issue-IV

October - December - 2018

Marathi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

# AJANTA

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Scien... lege
Mandangad, Dist. Ratnagi... 415203

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतातील ग्रामीण दारिद्र्य : एक अभ्यास<br>**प्रा. डी. पी. कांबळे** | १-३ |
| २ | विमुद्रीकरण : स्वरूप परिणाम<br>**प्रा. डॉ. सुभाष रा. गुर्जर** | ४-७ |
| ३ | महाराष्ट्रातील शेती उत्पन्नातील प्रादेशिक विषमता<br>**माधव शिंदे** | ८-१४ |
| ४ | नवीन आर्थिक धोरण<br>**डॉ. ढास डी. के.** | १५-१९ |
| ५ | भारताचा कृषी व्यापार<br>**प्रा. डॉ. शिवाजी पाते** | २०-२४ |
| ६ | भारतीय कृषी विकासामध्ये आधुनिक सिंचन पद्धतीचे महत्व<br>**प्रा. डॉ. मदन राधाकिसन शिंदे** | २५-३१ |
| ७ | विकास सेवा संस्था आणि विविध अभ्यास गट<br>**डॉ. मधुरा कुलकर्णी** | ३२-३६ |
| ८ | नवीन आर्थिक धोरण<br>**प्रा. डॉ. नीता तिवारी** | ३७-४१ |
| ९ | भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक विश्लेषणात्मक अभ्यास<br>**प्रा. चंद्रशेखर पुं. फरकाडे** | ४२-४५ |
| १० | भारतीय शेतकऱ्यांची आत्महत्या - एक आर्थिक चिंतन<br>**डॉ. संगीता टक्कामोरे** | ४६-४९ |
| ११ | भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील सेवा क्षेत्राची भूमिका<br>**डॉ. वाल्मिक दगडू परहर** | ५०-५३ |
| १२ | भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी उद्योगाची भुमिका<br>**प्रा. डॉ. एन. एन. धोंडगे**<br>**प्रा. डॉ. व्हि. डी. पाटील** | ५४-५८ |
| १३ | भारतीय अर्थव्यवस्था आणि नोटबंदी<br>**प्रा. हर्षद अरविंद एकबोटे** | ५९-६२ |
| १४ | भारतीय अर्थव्यवस्थेतील दारिद्र्याची समस्या<br>**प्रा. शेळके सी. एस.** | ६३-६७ |
| १५ | भारतीय अर्थव्यवस्थेतील वस्तू आणि सेवा कराची अंतिम मर्यादा आणि पुरोगामीत्व<br>**प्रा. रविंद्र बा. शेंडे** | ६८-७१ |
| १६ | भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणानंतर शहरीकरणाच्या संधी व आव्हाने<br>**पंकज मा. तायडे** | ७२-७८ |





PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri.415203.

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ११. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील सेवा क्षेत्राची भूमिका

**डॉ. वाल्मिक दगडू परहर**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंडणगड, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी.

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्र (शेती, जंगल, मासेमारी, खाणकाम, पशूपालन,), दुय्यम क्षेत्र (सर्व प्रकारचे उद्योग, बांधकाम, पाणी पुरवठा इ.) आणि तृतीय क्षेत्र (व्यापार, वाहतूक, दळणवळण, बॅकींग, विमा, पर्यटन, सार्वजनिक प्रशासन) अशी तीन प्रमुख क्षेत्रे महत्त्वाची असतात. या तिन्ही क्षेत्रांच्या विकासावर देशाचा सर्वांगिण विकास अवलंबून असतो. देशाचा विकास हा कृषी व उद्योगांच्या योगदानावर अवलंबून असला तरी या क्षेत्राला पूरक व महत्त्वाचा दूवा म्हणून सेवा क्षेत्रास अनन्य साधारण महत्त्व आहे. भारता सारख्या देशाची अर्थव्यवस्था विकसनशील आणि कृषीप्रधान असूनही अलिकडील काळात देशाच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्त्व वाढत आहे.

भारतानेसन १९९१ पासून स्विकारलेले खुले आर्थिक धोरण आणि जागतिक व्यापार संघटनेच्या व्यापार विषयक करारामुळे सेवा क्षेत्राचे स्वरूप व व्याप्ती वाढत आहे. इतकेच नव्हे तर सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे देशाच्या विकासाचे नवीन दालन खुले झालेले असून त्यामुळे भारतास नावलौकीकता प्राप्त झाली आहे.

प्रस्तूत शोधनिबंध हा दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे. सेवा क्षेत्रा संबंधित विविध संदर्भ ग्रंथ, पाक्षिके, मासिके, नियतकालिके, भारताचा आर्थिक पाहणी अहवाल व संकेतस्थळे आदींमधून माहिती संकलित केली आहे. या दुय्यम माहितीच्या आधारे शोधनिबंध तयार केला असून शोध निबंधात भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील सेवा क्षेत्राच्या योगदानाचा आढावा घेण्यात आला आहे.

- **The Service Industries Journal** : '' कोणत्याही प्राथमिक अथवा पूरक क्रिया जी भौतिक उत्पादन करत नाहीत म्हणजे विक्रेते व उपभोक्त्यांमधील बिगरवस्तू स्वरूपातील व्यवहार म्हणजे सेवा होय''
- **कोल्टर व आर्मस्ट्रॉग १९९१**: '' सेवा म्हणजे अशी क्रिया जिचा लाभ एका द्वारे दुसऱ्याला देताना वस्तू प्रमाणे मालकी निर्माण होत नाही तर गरजांची पूर्तता होते''

थोडक्यात नागरिकांच्या हितासाठी सरकार व खाजगी क्षेत्रा तर्फे निर्माण केलेल्या सुविधांचा प्रकार म्हणजे सेवा होय.

- **सेवांचे स्वरूप आणि वर्गीकरण**: सेवांचे सर्वसामान्यपणे स्वरूप व वर्गीकरण खालील प्रमाणे
  १. **व्यावसायिक सेवा**: समूपदेशन, बॅकींग, वित्त, विमा.
  २. **पायाभूत सेवा**: वाहतूक, दळणवळण.
  ३. **व्यापारी सेवा**: व्यापार, पर्यटन, मनोरंजन, बांणकाम, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान सेवा



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts Commerce & Science College

४. **सामाजिक सेवा:** शिक्षण, आरोग्य, कुटुंबकल्याण, प्रशिक्षण इत्यादी.

५. **लोकप्रशासन:** संरक्षण, व्यक्तिगत आणि सामुदायिक सेवा

**सेवा क्षेत्राची भूमिका**

सद्या भारतीय अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्राचे स्थान कमीकमी होत असून सेवा क्षेत्राचे स्थान वाढत आहे. अशा सेवा क्षेत्राचे देशाच्या अर्थव्यवस्थेतील योगदान खालीलप्रमाणे

- **स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील वाटयात वाढ**

  भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा हिस्सा दिवसें दिवस वाढत असल्याचे दिसून येते. सन १०५०–५१ मध्ये स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा वाटा चालू किंमतीनुसार ३०.५ टक्के होता. ते प्रमाण २०१७–१८ मध्ये ५५.२ टक्के इतका वाढला आहे.

- **आर्थिक वृध्दीचा निर्देशक**

  देशाच्या विकासाचा दर १९९० ला ५.७ टक्के वरून २००४–०५ ला ८.६ टक्के पर्यंत वाढला आहे. सेवा क्षेत्राच्या विकासाचा दर सन १९९० ते २०१४–१५ या काळात ७.५ टक्यांवरून १०.३ टक्के पर्यंत वाढला आहे. या वरून असे लक्षात येते की, सेवा क्षेत्राच्या विकासात वाढ झाली तर राष्ट्राच्या आर्थिक वृध्दीचा दर वाढत आहे.

- **रोजगार संधीत वाढ**

  भारतीय अर्थव्यवस्थेत रोजगार निर्मितीच्या दृष्टीने प्राथमिक व दुय्यम क्षेत्रांच्या तुलनेने अलिकडील काळात सेवा क्षेत्राला महत्त्व प्राप्त झाले आहे. सेवा क्षेत्रातील रोजगाराची संधी सन १९९३–९४ ते २०१५–१६ या काळात २२.३ टक्यांवरून ३२.० टक्यां पर्यंत वाढली आहे.

- **निर्यात व्यापारातील भर**

  सेवा क्षेत्र परकीय चलन मिळवून देणारा एक प्रमुख व्यवसाय आहे. माहिती तंत्रज्ञान, व्यावसायिक सेवांच्या निर्यातद्वारे मोठया प्रमाणावर परकीय चलन मिळवून देण्याचे काम सेवा क्षेत्र करत आहे. जागतिक सेवांच्या निर्यातीतील भारताच्या सेवांची निर्यात सन १९९०ते २०१६ या काळा दरम्यान ०.६ टक्यांवरून ३ टक्यांपर्यंत वाढली आहे. २०१६–१७ मध्ये भारतातील सेवा निर्यात १६३ अब्ज यू. एस डॉलर आहे.

- **सेवा क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक**

  भारताच्या आर्थिक विकासातील अडथळा म्हणजे भांडवलाची दुर्मिळता हा सेवा क्षेत्रातील थेट गुंतवणूकीमुळे दूर होण्यास मदत झाली आहे. १० महत्त्वाच्या वित्तीय आणि बिगरवित्तीय सेवा क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूकीचा एकत्रित प्रवाह एप्रिल २००० ते ऑक्टोबर २०१७ या काळात ५६.६ टक्के इतका होता.



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad,Dist.Ratnagiri

- **तंत्रज्ञान विकास**

  अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये तांत्रिक विकास घडवून आणण्यासाठी मूलभूत सुविधा आवश्यक असतात. सेवा क्षेत्राच्या विकासामुळे वाहतूक, दळणवळण, बॅकींग, वास्तव मालमत्ता व सार्वजनिक प्रशासन इत्यादी क्षेत्रांचा झपाटयाने विकास झाला आहे. त्यामुळे वेगाने तांत्रिक विकास होत गेला आहे.

- **प्राथमिक व दुय्यम क्षेत्रांचा आधार**

  सेवा क्षेत्राच्या विकासावर प्राथमिक व दुय्यम क्षेत्राचा विकास अवलंबून असतो. सेवा क्षेत्र प्राथमिक व दुय्यम क्षेत्राला माहिती तंत्रज्ञान, आर्थिक सेवा, सॉफ्टवेअर, वाहतूक, दळणवळण इत्यादी प्राथमिक सुविधा आणि सल्ला पुरवित आहे. कृषी व औद्योगिक क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा फार मोठा फायदा झाला आहे. सद्या शेतकरी शेतीत तसेच शेतमाल खरेदी विक्री आणि शेतमाल बाजारासाठी माहिती तंत्रज्ञान सेवांचा वापर करत आहेत.

- **उदयोजक कौशल्य**

  सेवा क्षेत्रात उदयोजकता कौशल्य विकासास चालना देण्याची क्षमता आहे. सेवा क्षेत्राच्या विकासामुळे उदयोजकांच्या कौशल्यात वाढ होत आहे. सेवा क्षेत्रामुळे किरकोळ, वैयक्तिक आरोग्य, वैयक्तिक काळजी आणि रेस्ट्रॉरेंट सारख्या क्षेत्रांमध्ये मोठया प्रमाणात लहानलहान उदयोजकांना संधी उपब्लध झाली आहे.

- **प्रसारमाध्यमे व मनोरंजन**

  प्रसारमाध्यमे आणि मनोरंजन हे एक महत्त्वाचे आणि आगामी विकसित होत जाणारे सेवा क्षेत्र आहे. ही एक बौध्दिक संपदा असून ती संपूर्ण देशात पसरली आहे. आपल्या देशात या क्षेत्रांचा झपाटयाने विकास होत आहे. २०१३ मध्ये या उदयोगांचा आकार ९१८ अब्ज होता. तो २०१४ मध्ये १०२६ अब्ज एवढा झाला आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे महत्त्व सकारत्मक असून आर्थिक सुधारणा काळा नंतर सेवा क्षेत्राचा विकास वेगाने झालेला आहे. भारतीय सेवा क्षेत्राचा वृध्दी दर इतर विकसित देशांच्या तुलनेत कमी असलेला दिसून येतो. वाहतूक, दळणवळण, पर्यटन, माहिती तंत्रज्ञान, विमाव्यवसाय, बॅकींग सेवा, व्यापार व व्यापार विषयक सेवा, लोकप्रशासन, हॉटेल, आरोग्य इत्यादीं सारख्या सेवांचा वेगाने विकास होत असल्याने सेवा क्षेत्र झपाटयाने विस्तारीत होताना दिसून येत आहे. मात्र या क्षेत्रास अपूरी रोजगार संधी, मर्यादीत लाभ, भाववाढ, अकूशल व अप्रशिक्षित कर्मचारी वर्ग आणि मक्तदारी अशा विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. देशाच्या विकासामध्ये शेती, उद्योग व सेवा ही तिन्ही क्षेत्राचा विकास अपरिहार्य आहे. कारण ही तिन्ही क्षेत्र परस्पर पुरक व एकमेकांवर अवलंबून आहेत परंतु सद्या सेवा क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचे योगदान असणारे प्रमुख क्षेत्र म्हणून ओळखले जात आहे.



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad Dist Ratnagiri 415203

संदर्भ

१. Dr. R. A. Johnson, A.D. Mascarenhas, &SonaliChatterjee, Business Economics, MananPrakashan, Mumbai, 2018, Page No- 175 to 195.

२. Dr. G.K Kolkoti, Dr. G. Rajalkshmy, Business Economics, Sheth Publication, Mumbai, 2018, Page No- 101 to 114.

३. प्रा. एस. एच. अट्टावलकर, व्यावसायिक अर्थशास्त्र, शेठ प्रकाशन, मुंबई, पान नं ९५ ते १०४

४. डॉ. रावसाहेब जाधव पारवेकर, व्यावसायिक अर्थशास्त्र, मीना प्रकाशन, रत्नागिरी, पाननं १२६ ते १३३

५. योजना मासिक, महाराष्ट्र शसन, बेलापूर नवी मुंबई, अंक २, सप्टेंबर २०११,



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad,Dist.Ratnagiri 415203